# पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

# प्रेसनोट २०२२

गुन्हे शाखा, नवी मुंबई

दिनांक ३०.०३.२०२२

---

**''सिबीडी पोलीस ठाण्याच्या हददीतुन दिड किलो मेथाक्युलॉन अंमली पदार्थ एकुण किंमत १,८५,२७,१००/- रू. चा मुद्देमाल नवी मुंबई गुन्हे शाखेचे पोलीसांनी केलेल्या कारवाईत जप्त''**

..................................................................................................................

मा. पोलीस आयुक्त, श्री. बिपीनकुमार सिंग, मा. पोलीस सह आयुक्त, श्री. जय जाधव, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. महेश घुर्ये, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) सुरेश मेंगडे यांनी नवी मुबंई नशामुक्त करण्याचे व अमली पदार्थ सेवन व विक्री करणा—या इसमांविरूद्ध कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहे.

दिनांक ३०/०३/२०२२ रोजी उरण फाटयाकडुन किल्ला जंक्शकडे जाणा—या रोडवरील एकता विहार बस स्टॉप जवळ, दोन इसम मेथाक्युलॉन (एम.डी पॉवडर) अमली पदार्थ विक्री करण्यासाठी येणार आहे अशी गुप्त बातमीदाराकडुन खात्रिशीर बातमी प्राप्त झाली. सदर बातमीच्या अनुषंगाने कारवाई करणेकरीता श्री. शैलेष पासलवाड, सहाय्यक पोलीस आयुक्त अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखा, यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पराग सोनवणे ने. अमावप्र. कक्ष, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बि.एस. सय्यद ने. एएनसी, पोहेकॉ/शेटये, पोहेकॉ/मांडोळे, पोहेकॉ/ वास्कर, पोना चौधरी, पोकॉ ठाकूर ने. अमावप्र कक्ष, तसेच, एएसआय/इनामदार, पोहेकॉ/कांबळे, पोहेकॉ/ पिरजादे, अहिरे ने. एएनसी यांनी सदर ठिकाणी सापळा रचून खालील आरोपींना ताब्यात घेतले आहे.

आरोपी नामे १) समसुद्दीन अजीजुल्लाह शेख, वय— ४१ वर्ष, धंदा व्यापार, रा. रूम नं १०३, अमन सोसायटी, पहिला माळ प्लॉट नं १४/१६ से. ०४ सिडको ऑफीसजवळ, कळंबोली नवी मुबंई, २) राजेंद्र उर्फ बारकू मारूती पवार, वय २९ वर्षे, धंदा— व्यापार, रा. शिरढोण गाव, पनवेल जि. रायगड यांना ताब्यात घेण्यात आले.

आरोपी क्रं. १) याच्या ताब्यात ९०० ग्रॅम व आरोपी क्रं २) यांच्या ताब्यरात ६५० ग्रॅम असा एकुण १ किलो ५५० ग्रॅम वजनाचा मेथक्युलॉन हा अमली पदार्थ विक्री करण्याच्या उद्दशाने स्वत:चे कब्ज्यात बेकायदेशिररित्या बाळगल्याचे मिळुन आले. आरोपी यांच्या ताब्यातुन सदरचा अमली पदार्थ, तीन मोबाईल फोन, रोख रक्कम, फॉरच्युनर कार असा एकुण १,८५,२७,१००/— रू. रकमेचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर आरोपीतांविरूद्ध सीबीडी पो.स्टे. गुन्हा रजि. नं. ४६/२०२२, गुंगीकारक औषधे आणि मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनीयम (एन.डी.पी.एस ॲक्ट) १९८४ चे कलम ८(क), २२(क), २९ अन्वये सिबीडी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

★★★★★★★★★★